Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# संविधान दिन आणि भारतीय संविधानाबाबत साक्षरतेची नितांत आवशकता



**विनय दामोदर**
पीएच.डी. विद्वान
टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई
न्यू रमेश नगर, डाबकी रोड, जुने शहर अकोला-444002
vishwajit.vinay@gmail.com

## ABSTRACT

कोणत्याही देशाची शासन प्रणाली त्या त्या देशाच्या संविधानावर अवलंबून असते. संविधानाला त्या देशाचा सर्वोच कायदा समजला जातो. संविधानामध्ये ढोबळमानाने देशातील सत्तेचे स्वरूप कसे आहे, शासन संस्थेचे स्वरूप, नागरिकाचे हक्क आणि कर्तव्ये, केंद्र राज्य संभंध इतर बाबित तरतूद असते.

२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो आहे. पूर्वी राष्ट्रीय कायदा म्हणूनही या दिवसाला ओळखले जायचे. आज संविधान तयार होऊन ७२ वर्षाचा कालावधी लोटला असून, या कालावधीत घटनेने देशातील अनेक चढ उतार पाहिले आहेत, त्या चढ उत्तारांना येशास्वी पणाने तोड देऊन देशात गुण्यागोविंदाने लोकशाही सर्वत्र नादात आहे. किंबहुना जगातील सर्वात मोठी लोकशाही असा नावलौकिक भारताचा आहे. याचे सारे श्रेय अर्थातच भारतीय संविधानालाच जाते.

## KEYWORDS

संविधान दिन, राष्ट्रीय कायदा, लोकशाही, नागरिकाचे हक्क, भारत